INTERNATIONAL RESEARCH JOURNAL OF HUMANITIES AND INTERDISCIPLINARY STUDIES
( Peer-reviewed, Refereed, Indexed & Open Access Journal )
DOI : 03.2021-11278686 ISSN : 2582-8568 IMPACT FACTOR : 5.71 (SJIF 2021)

# जिल्हा परिषद माध्यमिक शाळेतील विद्यार्थिनींची मासिक पाळी मुळे शाळेतील अनुपस्थिती व गळती

**श्रीमती सारीका धन्यकुमार जैन**

जिल्हा परिषद प्रशाला लाडसावंगी,
जि. औरंगाबाद
E-mail: jsarika945@gmail.com

**DOI No.** 03.2021-11278686 **DOI Link ::** https://doi-ds.org/doilink/07.2021-63915671/IRJHIS2107020

**प्रस्तावना :**

मानववंश शास्त्राप्रमाणे मानवाच्या जीवनात महत्त्वाचे चार टप्पे गृहीत धरले जातात. बाल्यावस्था, किशोरावस्था, प्रौढावस्था व वृद्धावस्था. पैकी शिक्षणासाठी महत्त्वाचा काळ हा किशोरावस्था असतो. किशोरावस्थेची शालेय शिक्षणापासून सुरुवात होऊन महाविद्यालयीन व उच्च शिक्षण ही वाटचाल सुरू असते. शिक्षण प्रवाहात असताना विद्यार्थ्यांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागते विशेषतः ग्रामीण भागातील मुलींना माध्यमिक शिक्षण घेताना अनेक अडथळे व समस्या निर्माण होतात. निरीक्षणाअंती असे दिसून आले आहे की, या अनेक समस्यांपैकी एक मासिक पाळी याकडे समस्या म्हणून पहिले जाते. ही बाब ग्रामीण भागातील माध्यमिक शाळांमध्ये शिक्षण घेणाऱ्या मुलींसाठी अडचण व शिक्षण प्रक्रियेतील अडथळा ठरत आहे. साधारणतः वयाच्या 10 ते 11 व्या वर्षी प्रत्येक मुलीला मासिक पाळी ची सुरुवात होते. त्या पौगंडावस्थेत प्रवेश करतात आणि त्यांच्यात अनेक शारीरिक मानसिक व भावनिक बदल व्हायला सुरुवात होते. मासिक पाळी ही मुलीच्या प्रजननक्षम वयाचे द्योतक असून ती एक आरोग्यपूर्ण व नैसर्गिक प्रक्रिया आहे. पण दुर्देवाने या बाबीला समस्या समजून त्याकडे नकारात्मक दृष्टीने पाहिले जाते.

माध्यमिक शाळांमधून शिक्षण घेणाऱ्या सर्वच मुलींच्या जीवनात हा महत्त्वाचा टप्पा येत असतो, पण एकविसाव्या शतकाकडे वाटचाल करणाऱ्या आपल्या समाजात आजही या विषयाबद्दल नकारात्मक दृष्टिकोन असून ग्रामीण भागात मासिक पाळी विषयक अनेक प्रकारच्या अंधश्रद्धा व अज्ञान यामुळे मुलींचे शिक्षण बंद होणे, बालविवाह या समस्या उद्भवतान दिसून येतात. या प्रतिकूल परिस्थितीचा सामना ग्रामीण भागातील माध्यमिक शाळेत शिक्षण घेणाऱ्या मुलींना शहरी भागातील मुलींपेक्षा तुलनेने अधिक प्रमाणात करावा लागतो.

या समस्यांवर उपाययोजनांचा शोध घेवून मुलींच्या शिक्षणातील अडथळे दूर करणे व त्यांना आत्मविश्वास पूर्वक शैक्षणिक वाटचाल करण्याची संधी उपलब्ध करून देणे हे शिक्षणकांचे व समाजव्यवस्थेचे कर्तव्य आहे.

**मासिक पाळी हा विषय समजुन घेण्याची आवश्यकता :**

ग्रामीण भागातील शाळांमध्ये मासिक पाळी व्यवस्थापन विषयक सुविधांचा अंतर्भाव नसल्यामुळे मुलींना अनेक समस्यांना सामोरे जावे लागते. निरीक्षणाअंती असे दिसून आले की, ग्रामीण भागामध्ये मासिक पाळी विषयक असणाऱ्या अंधश्रद्धा व अज्ञान यामुळे मुलींचे शिक्षण बंद करणे, त्यांना त्या दिवसांमध्ये शाळेत येण्यापासून परावृत्त करणे, बालविवाह इ . समस्या प्रामुख्याने उद्भवलेल्या दिसून येतात. या प्रतिकूल परिस्थितीचा सामना करताना मुलींचा आत्मविश्वास कमी होणे व मासिक पाळी कडे एक समस्या म्हणून बघणे असा दृष्टिकोन कायम राहतो.

समाजा-समाजामध्ये अबोल असणारा हा विषय शाळांमधूनही बोलला जात नसल्यामुळे मुलींची कुचंबना होते. मुलींना व्यवस्थापन संदर्भातील सुविधा शाळेत उपलब्ध नसतात त्यामुळे गैरहजर राहणे व गळती यासारख्या समस्यांना सामोरे जावे लागते व त्यांच्या शिक्षण प्रक्रियेत अडथळा आणि खंड निर्माण होतो.

मानव संसाधन विकास मंत्रालय, भारत सरकार (शिक्षा मंत्रालय) यांनी स्वच्छ भारत स्वच्छ विद्यालय हे “राष्ट्रीय अभियान” सप्टेंबर 2014 पासून सुरू केले. त्यानुसार प्रत्येक शाळेमध्ये स्वच्छता व आरोग्यविषयक सुविधा जसे प्रत्येक शाळेमध्ये मुला-मुलींसाठी स्वतंत्र स्वच्छतागृहे, स्वच्छ पिण्याचे पाणी, हात धुण्याची सुविधा ,साबण,त्यासोबतच क्षमता बांधणी इत्यादीचा अंतर्भाव आहे. याच अभियानाचा एक मुख्य घटक मासिक पाळी व्यवस्थापन हा आहे. अद्यापही या विषयाबद्दल जनजागृती झालेली दिसून येत नाही. शाळांमधून व्यवस्थापन विषयक भौतिक सुविधांची कमतरता जाणवते. परिणामी माध्यमिक शाळेमध्ये शिक्षण घेणाऱ्या किशोरवयीन मुलींची त्या दिवसांमधील अनुपस्थिती व गळतीचे प्रमाण वाढलेले दिसून येते.

शालेय शिक्षण घेणाऱ्या किशोरवयीन मुलींच्या मासिक पाळी व्यवस्थापन विषयक समस्या जाणून घेणे. किशोरवयीन शालेय मुलींच्या मासिक पाळी मुळे होणाऱ्या गळतीची कारणे शोधणे. मासिक पाळी व्यवस्थापन व त्याद्वारे शाळेतील किशोरवयीन मुलींच्या गळतीचे प्रमाण यातील सहसंबंध ओळखून त्याबद्दल निश्चित अनुमान काढणे. विद्यार्थिनींना शाळेमध्ये सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्यास होणार्या सकारात्मक परिणामांचा चिकित्सक अभ्यास करणे .मासिक पाळी विषयक अंधश्रद्धा व अज्ञान दूर करण्यासाठी प्रयत्न व मुलींच्या समस्या सोडवणुकीचे मार्ग शोधणे.

प्रस्तुत संशोधनासाठी औरंगाबाद जिल्ह्यातील जिल्हा परिषद माध्यमिक शाळेतील इयत्ता नववी व दहावी मध्ये शिक्षण घेत असलेल्या 140 विद्यार्थिनींची निवड करण्यात आली. सदर मुलिंची मुलाखत व प्रश्नावली या संशोधन साधनांचा उपयोग करुन महिती जमा संकलन व माहितीचे विश्लेषण करण्याकरिता करण्यात आला. उपक्रम पूर्व चाचणी घेण्यात आली. त्यामध्ये मासिक पाळी व्यवस्थापन विषयक दहा प्रश्नांचा समावेश करण्यात आला. पूर्व चाचणीचे तालिका करण व अर्थनिर्वचन करून निष्कर्षाप्रत पोहोचताना असे दिसून आले की :

1. 95% मुलींना मासिक पाळी विषयी शास्त्रीय ज्ञान नाही.

2. 50 % मुलींना मासिक पाळी दरम्यान शाळेत उपस्थित राहण्यासाठी कुटुंबातून विरोध दिसून आला.

3. 80 % मुली शाळेमध्ये मासिक पाळी विषयक सुविधांअभावी अनेक समस्यांचा सामना करतात.

4. 70 %. मुलींना मासिक पाळी ची भीती वाटते.

5. अंधश्रद्धा व अज्ञान यामुळे मुलींच्या आरोग्यपूर्ण शैक्षणिक विकासात अडथळा निर्माण होतो.

**किशोरवयीन मुलींच्या समस्या सोडवण्यासाठी शिफारसी :**

1)मुलींना मासिक पाळी विषयी शास्त्रीय ज्ञान मिळावे व अंधश्रद्धा दूर व्हावी यासाठी शाळांमधून उद्बोधन वर्गाचे आयोजन करण्यात यावे .

2)मुलींची मासिक पाळी दरम्यान शाळेतील असुविधांमुळे होणारी गळती थांबवण्यासाठी युनिसेफने सुचविलेल्या निकषांनुसार शाळेमध्ये चेंजिंग रूम बनवावी.

3) शाळा एम. एच. एम. फ्रेंडली बनवण्यात यावी अर्थात मासिक पाळी व्यवस्थापन विषयक सर्व सुविधा जसे सॅनिटरी नॅपकिन च्या सहज उपलब्धतेसाठी वेंडिंग मशीन, वापरलेल्या शोषकांच्या विल्हेवाटीसाठी इंसीनरेटर, रेड डोटेड डस्ट बिन, हँडवॉश, इत्यादी सुविधांचा अंतर्भाव असणे आवश्यक आहे.

4) मुली व त्यांच्या पालकांसाठी शाळेमध्ये जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात यावे जेणेकरून अंधश्रद्धेला आळा बसून मुलींना शाळेत पाठविण्यासाठी पालकांमध्ये सकारात्मकता वाढेल.

5) मुलींना मासिक पाळी प्रक्रियेविषयी शास्त्रशुद्ध ज्ञान मिळावे यासाठी प्रशिक्षित तज्ज्ञांचे मार्गदर्शन सत्र आयोजित करण्यात यावे.

6) ग्रामीण भागातील माध्यमिक शाळांमधील मासिक पाळी दरम्यान मुलींची होणारी गळती कमी होण्यास मदत होईल.

7) मुलींचा आत्मविश्वास वाढेल.

8)मुलींची शाळेतील अनुपस्थिती कमी झाल्यामुळे निश्चितच अध्ययन प्रक्रिया सुलभ होऊन गुणवत्ता वाढ होण्यास मदत होईल

9) मुलींना शारीरिक व मानसिक स्वास्थ्य टिकवण्याचे ज्ञान मिळाल्यामुळे भविष्यात येणाऱ्या अनारोग्याच्या समस्या कमी होतील

10) शाळेचा दर्जा उंचावेल

11) बालविवाह प्रतिबंध सहाय्यक ठरेल

12) ग्रामीण भागातील माध्यमिक शिक्षणासाठी मुलींचे शाळेत येण्याचे प्रमाण वाढेल.

**सारांश:**

माध्यमिक शाळांमधील किशोरवयीन मुलींना मासिक पाळी विषयक येणाऱ्या समस्या कमी होऊन शिक्षण प्रक्रिया सुलभ होणे शक्य होईल. शाळेमध्ये सर्व भौतिक सुविधा उपलब्ध झाल्यामुळे

मुलींची त्या विशिष्ट दिवसातील गळतीचे प्रमाण कमी होईल. दररोज शाळेमध्ये हजर राहिल्यामुळे शिक्षण प्रक्रियेत खंड पडणार नाही व त्यामुळे गुणवत्ता वाढीस मदत होईल. मुलींचा आत्मविश्वास वाढेल

**संदर्भ :**

1) एम. एच., एम ट्रेनिंग प्रोग्राम, युनिसेफ व महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद पुणे.

2) मेंस्त्रूअल हायजिन मॅनेजमेंट बुक, बाय युनिसेफ

3) राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य मिशन हेल्थ प्रोग्राम इंडिया

4) अनुराधा सी, मुलींमध्ये मासिक पाळी (2007)

5) भट्टाचार्य, किशोरवयीन मुलींचा अनुभव, इन्स्टिट्यूट ऑफ मेडिसिन जर्नल 2.58- 61